महाराष्ट्र शासन

# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. १४३/प्रनिप्रा/१५४८ दिनांक : 04 JUL 2022

**बैठकीचे इतिवृत्त**

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, **दिनांक १५ जुन, २०२२ रोजी दुपारी १२:०० वा. व ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक ५८ व्या बैठकीचे इतिवृत्त,-

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ४) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ६) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा, व ७) श्री. रविंद्र जगताप (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

१) डॉ. सुभाष महाजन, अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा परीक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १: खालील नमूद तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

| अ. क्र. | बैठकीचे वेळापत्रक | | विभाग | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | | |
| १) | १५/०६/२०२२ | दुपारी १२:०० वा. | वैद्यकीय शिक्षण | पीजीपी |
| | | दुपारी ०३:०० वा. | | पीजी-एमएएसएलपी आणि पीजी-एमएसपीओ |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी पीजीपी, पीजी-एमएएसएलपी आणि पीजी-एमएसपीओ या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाची क्रमांक ५८ वी बैठक दिनांक ११/०५/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती, परंतू सदरील बैठकीमध्ये संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्यामार्फत महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५, कलम ९(५) मधील तरतुदीनुसार प्रथम वर्ष व्यासायिक पदवी पीजीपी, पीजी-एमएएसएलपी आणि पीजी-एमएसपीओ अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अहवाल प्राप्त न झाल्याने व संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक संवैशिवसं/शै.व. २०२१-२२/पदवी-पदव्युत्तर पडताळणी/२०२२, दिनांक ०९/०५/२०२२ रोजीच्या पत्राद्वारे केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने प्राधिकरणाची क्रमांक ५८वी बैठक दिनांक १५/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी पीजीपी, पीजी-एमएएसएलपी आणि पीजी-एमएसपीओ अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार संबंधीत महाविद्यालयांमार्फत प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव अद्याप प्राप्त झाले नसल्यामुळे सदरील अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश ना मंजुर करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

या संदर्भात शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी पीजीपी, पीजी-एमएएसएलपी आणि पीजी-एमएसपीओ अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५, कलम ९(५) (१) मधील तरतूदींनुसार संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव विहित कालावधीमध्ये सादर केले किंवा कसे याबाबतचा सविस्तर तपशील संचालनालयाने प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी पीजीपी, पीजी-एमएएसएलपी आणि पीजी-एमएसपीओ. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) Hilly Area, २) PWD, ३) Defense, ४) MKB व ५) Orphan या संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. या अनुषंगाने प्राधिकरण कार्यालयाने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक २ : मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

(क) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील कृषी व तंत्र शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत.**

अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर तंत्र शिक्षण व कृषी शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संबंधीत संचालनालयांनी प्रमाणित केलेले प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव अद्याप ज्या महाविद्यालयांनी प्राधिकरणास विहित कालावधीमध्ये सादर केले नसल्याने संबंधीत महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाच्या मागील बैठकीत मान्यता प्राप्त झालेली नाही, अशा संबंधीत महाविद्यालयांचे प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव सद्यस्थितीमध्ये महाविद्यालयांनी

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणास सादर केलेले आहेत व प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क भरणा केलेलां आहे, अशा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास संचालनालयाच्या अहवालानुसार प्राधिकरणाची मान्यता देण्यात येत आहे. **(प्रपत्र-अ)** तथापि, अशा महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यास दिरंगाई केल्याप्रकरणी संबंधीत महाविद्यालयांना रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील दंडाची रक्कम महाविद्यालयाने हे आदेश पारीत झाल्यापासून १० दिवसांत "THE SECRETARY, ADMISSIONS REGULATING AUTHORITY, MUMBAI" या नावाने धनाकर्षाद्वारे (Payable at Mumbai असावा) भरणा करणे बंधनकारक राहील व तद्नंतर संबंधीतांना प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

या संदर्भात ज्या महाविद्यालयांनी संबंधीत संचालनालयांने प्रमाणित केलेले प्रवेश मान्यतेचे अहवाल अद्याप प्राधिकरणास सादर केलेले नाहीत, अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही **(प्रपत्र-ब)**, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. प्राधिकरणाचा सदरील निर्णय सर्व संबंधीतांना संचालनालयामार्फत कळविण्यात यावा.

उक्त प्रकरणी प्रवेश नियमाक प्राधिकरणाची मान्यता प्रदान केलेल्या व ना मंजूर केलेल्या प्रवेशांचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-अ) | | | | अमान्य केलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ब) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेले विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी |
| **तंत्र शिक्षण** | | | | | | | |
| १) | पदवी अभियांत्रिकी / तंत्रज्ञान | ५९ | ५६ | ०४ | १५०६७ | ३२ | ३८२४ |
| २) | पदवी औषधनिर्माणशास्त्र | ५४ | ०८ | ०१ | ४६४१ | ५९ | ४८८५ |
| ३) | थेट द्वितिय वर्ष अभियांत्रिकी | ५७ | ४८ | ०३ | ९५८९ | ३३ | ४२४६ |
| ४ ) | थेट द्वितिय वर्ष औषधनिर्माणशास्त्र | ४३ | ०० | ०१ | ७७४ | ५५ | १२०६ |
| ५) | MBA/MMS | ४७ | १८५ | ०५ | ४२७६ | ४६ | ४४३६ |
| ६) | MCA | ११ | ०४ | ०० | १२४६ | २० | १४४८ |
| ७) | B. Architecture | २९ | ०५ | ०२ | १२०१ | ०७ | १८८ |
| ८) | B.HMCT | ०३ | ०१ | ०० | ३०७ | ०१ | १८ |
| ९) | M. Engineering / M.Tech. | ३० | ०२ | ०० | ३३१ | १५ | १५७ |
| १०) | M. Pharmacy | १७ | ०६ | ०२ | ५४० | १२ | २७३ |
| ११) | M. Architecture | १० | ०१ | ०१ | १५ | ०१ | ०० |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

| अ. क्र. | अभ्यासक्रम | निर्णय घेतलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-अ) | | | | अमान्य केलेल्या प्रवेशांची माहिती (प्रपत्र-ब) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालये | त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | रद्द झालेले प्रवेश | मान्यता दिलेले विद्यार्थी | महाविद्यालये | विद्यार्थी |
| १२) | M. HMCT | ०१ | ०० | ०० | ०७ | ०० | ०० |
| १३) | Pharm D. | ०० | ०० | ०० | ०० | १४ | ३८९ |
| १४) | Pharm. D (PB) | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ३० |
| | एकुण : | ३६१ | ३१६ | १९ | ३८१२९ | २९७ | २११०० |
| | कृषी शिक्षण | | | | | | |
| १) | B.Sc. (Honours) (Agriculture) | ०३ | ०० | ०० | २०६ | ०० | ०० |
| २) | B. Tech. (Biotechnology) | ०१ | ०० | ०० | ६२ | ०० | ०० |
| ३) | B.Sc. (Honours) (Forestry) | ०१ | ०० | ०० | ३९ | ०० | ०० |
| | एकुण : | ०५ | ०० | ०० | ३०७ | ०० | ०० |

**(ख) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व त्यापूर्वी व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित झालेले परंतू प्राधिकरणाची मान्यता अद्याप प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी.**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधीत संचालनालयाने त्रुटी दर्शविली किंवा प्राधिकरणाच्या निवडक पध्दतीने तपासणी/छाननी प्रक्रियेमध्ये त्रुटी निर्दशनास आली, असे प्रवेश वगळून इतर सर्व प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता वेळोवेळी प्रदान करण्यात आलेली आहे व ना मंजूर करण्यात आलेल्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाचा निर्णय सर्व संबंधीतांना 'प्रवेश मान्यता पत्राद्वारे' व प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या इतिवृत्ताद्वारे अवगत करण्यात आलेले आहेत.

सबब या संदर्भात संबंधीत ना मंजूर असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सुनावणी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत किंवा ज्या प्रवेश प्रकरणी सुनावणी आदेश निर्गमित झालेले नाहीत व अशा सर्व प्रकरणी विद्यापीठाद्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या 'प्रवेश पात्रतेच्या' अनुषंगाने संबंधीत विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : ५/७/२